महाराष्ट्रातील २५ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांची बदली; जाणून घ्या कोणाची कुठे झाली बदली >> पान 2

क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबिरातून घडतील उत्कृष्ट खेळाडू-कारागृह अधीक्षक मेघा बाहेकर >> पान 3

पत्रकार परिषद संपताच रौंदळे पोलिसांच्या ताब्यात; डोणगाव प्रकरणाला नवे वळण >> पान 4

**सुविचार**

स्वप्न पाहणे सोडू नका,
ती पूर्ण करण्यासाठी धाडस करा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 234 ■ शुक्रवार, दि. 03 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



जमिनीच्या वादामुळं अभिनेत्री सोनाली बेंद्रे अडचणीत

आतील पान

# होर्मुझ सामुद्रधुनी सुरळीत करण्यासाठी ब्रिटनने घेतला पुढाकार, चर्चेसाठी भारताला निमंत्रण

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

**संपूर्ण जगाचे लक्ष वेधलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव निवळण्यासाठी आणि व्यापार मार्ग पुन्हा सुरळीत करण्यासाठी ब्रिटनने पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात चर्चा करण्यासाठी ब्रिटनने भारतासह अनेक देशांना निमंत्रित केले असून, परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी उच्चस्तरीय बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी ( दि. २) या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**



**ऊर्जा सुरक्षेसाठी भारताचे प्रयत्न**

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, भारतानेही या भागात आपली सक्रियता वाढवली आहे. भारतीय जहाजांची वाहतूक विनासायास आणि सुरक्षित व्हावी, यासाठी भारत इराणसह संबंधित प्रादेशिक देशांशी सातत्याने संवाद साधत आहे. जैस्वाल यांनी सांगितले की, आम्ही इराण आणि इतर संबंधित देशांच्या संपर्कात आहोत, जेणेकरून आपल्या जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध होईल. भारताच्या या मुत्सद्दी प्रयत्नांना यश मिळत असून, गेल्या काही दिवसांत सहा भारतीय जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे मार्गस्थ झाली आहेत.

**इराणकडून भारताला प्राधान्य**

सध्या मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे इराणने होर्मुझ सामुद्रधुनीबाबत कठोर भूमिका घेतली असली तरी, भारताच्या मालवाहू जहाजांना मात्र विशेष सवलत देण्यात आली आहे. भारत हा अशा मोजक्या देशांपैकी एक आहे, ज्यांच्या जहाजांना या मोक्याच्या जलमार्गावरून जाण्यास परवानगी मिळाली आहे. यामध्ये भारताच्या घरगुती वापरासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या एलपीजी आणि एलएनजी सारख्या ऊर्जा संसाधनांचा समावेश आहे.दरम्यान, इराणला कोणतीही 'टोल' किंवा शुल्क भरून ही जहाजे मार्गस्थ होत आहेत का, याबाबतच्या चर्चांना परराष्ट्र मंत्रालयाने पूर्णविराम दिला आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही 'टोल' प्रणालीचे वृत्त मंत्रालयाने फेटाळून लावले आहे.

# पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील सीमा शुल्क पूर्णपणे माफ

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय!

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

पश्चिम आशियातील सततचा तणाव आणि जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्ययांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ३० जून २०२६ पर्यंत प्रमुख पेट्रोकेमिकल उत्पादनांवरून सीमा शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतलाय. अर्थ मंत्रालयाने गुरुवारी ही घोषणा केलीय. एका निवेदनात मंत्रालयाने नमूद केले की, देशांतर्गत अत्यावश्यक पेट्रोकेमिकल कच्च्या मालाची अखंड उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी संबंधित उद्योगांवरील खर्चाचा बोजा कमी करण्यासाठी आणि पुरवठ्यातील स्थिरता राखण्यासाठी एक तात्पुरता आणि लक्ष्यित दिलासा म्हणून हे पाऊल उचलण्यात आलंय.

सरकारच्या मते, या निर्णयाचा फायदा प्लास्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण (फार्मा), रसायने, वाहन सुटे भाग आणि इतर उत्पादन उद्योगांसारख्या क्षेत्रांना होण्याची अपेक्षा आहे. यामुळे अंतिम उत्पादनांच्या ग्राहकांनाही दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या सवलतीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रमुख पेट्रोकेमिकल उत्पादनांमध्ये निर्जल अमोनिया , टोल्युइन, स्टायरिन, डायक्लोरोमेथेन, विनाइल क्लोराईड मोनोमर, मिथेनॉल, आयसोप्रोपाइल अल्कोहोल, मोनोइथिलीन ग्लायकोल आणि फिनॉल यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त ॲसिटिक ॲसिड, विनाइल ॲसिटेट मोनोमर, प्युरिफाईड टेरेफ्थॅलिक ॲसिड, अमोनियम नायट्रेट, इथिलीनचे पॉलिमर, इपॉक्सी रेझिन्स, फॉर्मल्डिहाइड, युरिया-फॉर्मल्डिहाइड, मेलामाइन-फॉर्मल्डिहाइड आणि फिनॉल-फॉर्मल्डिहाइड यांसारख्या उत्पादनांचाही या यादीत समावेश करण्यात आलाय.

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अधिपत्याखाली सरकारने गेल्या महिन्यातच एक निर्णय घेतला होता. त्यानुसार, (निर्यात केलेल्या उत्पादनांवरील शुल्क आणि करांची माफी) योजनेअंतर्गत पात्र असलेल्या सर्व निर्यात उत्पादनांसाठीचे दर आणि मूल्याची कमाल मर्यादा २३ मार्चपासून पूर्ववत करण्यात आलीय. वाढता मालवाहतूक खर्च आणि युद्धाशी संबंधित व्यापारी जोखीम (विशेषतः आखात आणि पश्चिम आशियातील सागरी मार्गांमधील व्यत्ययांच्या पार्श्वभूमीवर) यांचा सामना करणाऱ्या भारतीय निर्यातदारांना वेळेवर दिलासा देणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे.

# न्यायव्यवस्थेवरील वक्तव्यामुळे वाद पेटला; संजय राऊतांवर कारवाईची भाजपची मागणी

**बीड/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते संजय राऊत यांच्या न्यायव्यवस्थेबाबतच्या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. ''देशातील न्यायव्यवस्था केंद्रातील सत्ताधाऱ्यांची गुलाम आहे'' असे विधान राऊत यांनी केल्याने भाजपने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. भाजपचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी या वक्तव्याचा निषेध करत हे न्यायव्यवस्थेचा सरळ अपमान असल्याचे म्हटले आहे. अशा विधानांमुळे समाजात अशांतता निर्माण होऊ शकते तसेच जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संजय राऊत यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपकडून करण्यात आली आहे. या मुद्द्यावरून पुढील काही दिवसांत राजकीय वाद अधिक चिघळण्याची शक्यता आहे.



# बुलढाण्याला नवे जिल्हाधिकारी; डॉ. किरण पाटील यांची बदली, डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाने प्रशासनिक पातळीवर मोठे फेरबदल करत बुलढाणा जिल्ह्याला नवे जिल्हाधिकारी दिले आहेत. सध्या जिल्ह्याची धुरा सांभाळणारे डॉ. किरण पाटील यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.






डॉ. प्रवीणकुमार देवरे हे २०१३ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. नियुक्तीपूर्वी ते पुणे येथे पशुसंवर्धन आयुक्त या पदावर कार्यरत होते. प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असलेले देवरे आता बुलढाणा जिल्ह्याचा कारभार सांभाळणार आहेत.

नवीन जिल्हाधिकाऱ्यांसमोर जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प, शेतकरी प्रश्न, जिगाव प्रकल्प तसेच पायाभूत सुविधांच्या विकासाची मोठी आव्हाने असणार आहेत. त्यांच्या अनुभवाच्या जोरावर जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. डॉ. देवरे लवकरच आपल्या पदाचा पदभार स्वीकारणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर जिल्ह्यातील प्रशासनिक कामकाजात कोणते बदल होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हनुमान जयंतीनिमित्त वानरसेनेला अनोखा पाहुणचार





दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** हनुमान जयंतीनिमित्त अकोला जिल्ह्यातील बार्शिटाकळी तालुक्यातील कोथळी बुजरूक येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही एक अनोखी आणि आगळीवेगळी परंपरा पार पडली. मुंगसाजी महाराज संस्थानच्या वतीने गावातील मंदिर परिसरात माकडांसाठी विशेष पंगतीचे आयोजन करण्यात आले.

हनुमान जयंतीच्या निमित्ताने तीन दिवस चालणाऱ्या या उपक्रमात माकडांना त्यांच्या आवडीचे मिष्टान्न आणि विविध खाद्यपदार्थ वाढले जातात. विशेष म्हणजे, या पंगतीत माकडेही शिस्तीत रांगेत बसून दिलेल्या अन्नावर ताव मारताना दिसतात. माणसांनाही लाजवेल अशी ही शिस्त पाहून उपस्थित भाविक आश्चर्यचकित होतात.

मंदिर परिसर घनदाट जंगलात असल्याने येथे माकडांची संख्या मोठी आहे. गेल्या सुमारे २० वर्षांपासून ही परंपरा सातत्याने जोपासली जात असून, हनुमान भक्तीतूनच या उपक्रमाची प्रेरणा घेतली जाते.

पंगतीची सुरुवात संस्थानसमोर नैवेद्य अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर झाडांवरून माकडे खाली उतरून पंगतीत सहभागी झाली. प्रत्येक माकडास स्वतंत्र ताट देऊन त्यांना भोजन वाढण्यात आले.

या अनोख्या परंपरेमुळे परिसरात हनुमान जयंतीचा उत्साह द्विगुणित झाला असून, भाविकांसाठी हा उपक्रम विशेष आकर्षण ठरत आहे, अशी माहिती संस्थानचे पूजारी रामदास शिंदे महाराज यांनी दिली.

# देशी बनावटीच्या पिस्तुलासह तिघांना अटक; १.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव जामोद /प्रतिनिधी :** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी बुलढाणा पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जळगाव जामोद येथे देशी बनावटीचे पिस्तूल बाळगून त्याची अवैध खरेदी-विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तिघांना पोलिसांनी अटक केली. या कारवाईत एकूण १ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला १ एप्रिल २०२६ रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, जळगाव जामोद परिसरातील काही युवक देशी बनावटीचे पिस्तूल बाळगून त्याची विक्री करण्याच्या तयारीत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत संबंधित ठिकाणी छापा टाकला.

या कारवाईदरम्यान पवन इंद्रसिंग डावर (वय २३, रा. राजूर बु.), संजय भिलसिंग बोडल (वय २०, रा. राजूर बु.) आणि रमेश दुर्गसिंग बारेला (वय २४, रा. इस्लामपूर, ता. जळगाव जामोद) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या झडतीदरम्यान एक देशी बनावटीचे पिस्तूल (मॅगझिनसह, अंदाजे किंमत ४० हजार रुपये), दोन जिवंत काडतुसे (किंमत २ हजार रुपये) आणि एक होंडा शाइन मोटारसायकल (किंमत ८० हजार रुपये) असा एकूण




१,२२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी फिर्यादी पोलीस कर्मचारी गणेश पाटील यांच्या तक्रारीवरून जळगाव जामोद पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्टच्या कलम ३, ५ तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम १२३ व १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून शस्त्राचा स्रोत, तसेच त्यामागील नेटवर्क उघड करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक, पोलीस कर्मचारी व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सक्रिय सहभाग घेतला. जिल्ह्यातील नागरिकांनी संशयास्पद हालचालींबाबत तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मानवी नात्यांचा पैशांत विचार नको

विजयपत यांचा जन्म व्यापार-उद्योगातील प्रतिष्ठित सिंघानिया कुटुंबात झाला. त्यांनी 'रेमंड' या भारतातील प्रख्यात वस्त्रनिर्माण कंपनीचे नेतृत्व केले. त्यांच्या कर्तृत्वामुळे 'रेमंड' हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित ब्रॅण्ड झाला. त्यांनी 'रेमंड'चा उत्पादन, किरकोळ विक्री आणि निर्यात या क्षेत्रात प्रचंड विस्तार केला. सिंघानिया यांनी 'मुंबईचे शेरीफ' या मानाच्या पदावर काम केले. त्यांना विमान उड्डाणाची आवड होती. त्यांनी विमान उड्डाण आणि बलून उड्डाणाच्या बाबतीत अनेक विक्रम प्रस्थापित केले. ते प्रशिक्षित पायलट होते व त्यांना 'मानद एअर कमोडोर' पदवी मिळाली होती. उद्योग आणि समाजासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा किताब प्रदान केला. विजयपत सिंघानिया यांचे वैयक्तिक आयुष्य वादळी होते. त्यांनी त्यांच्या मुलाकडे गौतम सिंघानिया यांच्याकडे आपले 'रेमंड' कंपनीतील मालकीचे सर्व शेअर्स हस्तांतरित केले होते. त्यानंतर गौतम सिंघानिया यांच्याकडे कंपनीची सूत्रे आली. विजयपत सिंघानिया यांना कुटुंबात वाईट वागणूक मिळाल्याचे सांगण्यात येते. एकेकाळी 'रेमंड' या जागतिक कंपनीचे प्रमुख व हजारो कोटींच्या मालमत्तेचा मालक असलेल्या या उद्योगपतीला कुटुंबात उपेक्षा झाल्यामुळे रस्त्यावर यावे लागले व जगणे कठीण झाले. त्यांच्याकडे उरलेल्या थोड्या रकमेवर त्यांना गुजराण करावी लागली. वरील पार्श्वभूमीवर विजयपत सिंघानिया यांनी २०२३ साली 'बिझनेस टुडे' या नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीतील त्यांचे वक्तव्य पुन्हा एकदा सोशल मीडियात चर्चेत आले आहे. त्यावेळी त्यांनी म्हटले होते, ''पालकांना माझे आवाहन आहे की, आपल्या मुलांना आपल्याकडचे सर्व काही देताना काळजीपूर्वक विचार करावा. मी असे म्हणत नाही की, मुलांना देऊ नका. माझे एवढेच सांगणे आहे की, तुमच्या मृत्यूनंतरच त्यांना द्या. तुमच्या जिवंतपणी देऊ नका. कारण, तुम्हाला खूप मोठी किंमत मोजावी लागेल.'' सिंघानिया कुटुंबात नक्की काय झाले, हे आपल्यासारख्या बाहेरच्या लोकांना माहिती नाही. त्यामुळे त्याबद्दल न बोललेले बरे. खरेतर कोणाच्याही वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलू नये. तथापि, विजयपत सिंघानिया यांनी जाहीर मुलाखतीत कुटुंबसंस्थेविषयी केलेल्या वक्तव्याबद्दल आपण बोलू शकतो. 'मुलांना आपल्या हयातीत सर्व काही देऊ नका,' असे त्यांचे म्हणणे होते. अनेकांनी त्यांचे मत उचलून धरले. तथापि, त्याबद्दल माझे मत वेगळे आहे. सनातन पद्धतीत विश्वास महत्त्वाचा. पालक मुलांना वाढवतात, मुलांना जास्तीत-जास्त चांगले आयुष्य मिळावे, यासाठी धडपडतात. अफाट कष्ट करतात, त्याग करतात. आपल्याला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले, त्या अडचणी मुलांच्या आयुष्यात नसाव्यात असे पालकांना वाटते. मुलेही लहानपणापासून आपले आई-बाप आपल्यासाठी किती कष्ट करत आहेत, हे पाहत असतात. मुलांचे आणि आई-बापाचे नाते हे नैसर्गिक प्रेमाचे नाते असते. त्यामध्ये आर्थिक देवाणघेवाणीचा मुद्दा नसतो. आई-बाप गरीब असले, तरीही मुलांना त्यांच्याबद्दल प्रेम आणि कृतज्ञता असते. अशा पालकांची मुले मोठी झाली आणि आयुष्यात यशस्वी झाली, तरी आपल्या गरीब आई-बापांना प्रेमाने सांभाळतात. त्यांच्या आजारपणात त्यांची सेवा करतात. कारण, हे नाते आर्थिक निकषावर नसते; तर प्रेमाचे नाते असते. मुलांचा आई-बापावर पूर्ण विश्वास असतो. लहानपणी तर आपले पालक म्हणतील तेच खरे, असे मुलांना वाटते. पालकांनीही मुलांवर भरवसा ठेवला आणि प्रेमाने वागविले, तर मुले सहसा कधी विश्वासघात करत नाहीत. अनेकदा मुले मोठी झाली, तरी आपल्या आईला किंवा वडिलांना बाहेर काय घडले, हे सर्वकाही सांगतात. आपल्या सनातन समाजामध्ये अशीच रीत आहे. पालक मुलांसाठी सर्वस्वाचा त्याग करतात, मुले त्यांना आत्मीयतेने सांभाळतात. पुढे मुले त्यांच्या मुलांसाठी सर्वस्वाचा त्याग करतात. हे सनातन चक्र चालू राहते. आपणा सर्वांसमोर श्रीरामाचा आदर्श आहे. वडिलांच्या वचनपूर्तीसाठी वनवास सोसणाऱ्या श्रीरामाने त्यागाचा आदर्श निर्माण केला आहे. विजयपत सिंघानिया यांनी मुलाखतीत मुलाला सर्वकाही देण्याच्या विरोधात मत व्यक्त केले. त्यांच्या निधनानंतर सोशल मीडियावर तशीच चर्चा करणाऱ्यांना भारतीय सनातनी वास्तव ध्यानात आले नाही, असे मला नम्रपणे वाटते. आपल्या आसपास पाहा, पालकांचे मुलांसोबतचे नाते हे विश्वासाचे असते. आपण मुलांना प्रेमाने वाढविले, ते आपल्याला म्हातारपणी आधार देतील, असे त्यांना खात्रीने वाटते. आपल्या भोवती पाहा, बहुतांश असेच घडताना दिसते. विजयपत सिंघानिया यांच्या बाबतीत जे घडले, ते अपवाद आहे; असे माझे मत आहे. अशा अपवादावरून सनातन समाजातील प्रेमाच्या नात्याबद्दल शंका घेणे चांगले नाही. आमचे वडील संघाचे समर्पित स्वयंसेवक होते. मजदूर संघाच्या कार्याला त्यांनी वाहून घेतले होते. ते रेल्वेमध्ये नोकरीला होते. निवृत्तीच्या वेळी त्यांना मिळालेले एक लाख, २० हजार रुपये त्यांनी मला आणि माझ्या भावाला दिले. आमच्या आयुष्याच्या सुरुवातीला मदत होईल, असे त्यांना वाटले. वडिलांच्या निवृत्तीनंतर त्यांनी त्यांच्याकडचे सर्व पैसे आम्हाला दिले असले, तरी कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणून त्यांनाच मान होता. पुढे त्यांच्या आजारपणाच्या काळात आम्ही सर्वांनी त्यांची सेवा केली. वैद्यकीय उपचारांचा खर्चही केला. एकदा मी आणि माझ्या भावाने सहज हिशोब केला. त्यावेळी ध्यानात आले की, वडिलांच्या उपचारांवर आम्ही १३ लाख रुपये खर्च केले होते. वडिलांनी कुटुंबात कधी पैशाचा विचार केला नाही. त्यांच्या बाबतीत आम्हीही कधी विचार केला नाही. आज पैशांच्या आधारावर नाती मोजण्याचा प्रकार चालू आहे, म्हणून हे सांगावेसे वाटले. केवळ पैशांच्या जोरावर नाती मोजणाऱ्यांना मी आणखी एक वास्तव नजरेस आणू इच्छितो, विजयपत सिंघानिया म्हणाले त्याप्रमाणे, पालकांनी मुलांना हयातीत सर्वकाही दिले नाही व स्वतःसाठी संपत्ती राखून ठेवली; तरी सर्व प्रश्न सुटतात असे नाही. मला नागपुरातील, पुण्यातील, मुंबईतील अनेक पालक माहिती आहेत, ज्यांनी आपल्या आयुष्यात भरपूर पैसे कमावले, मुलांना चांगले शिक्षण दिले, त्यांना आयुष्यात 'सेटल' केले आणि आता दोघे ज्येष्ठ नवरा-बायको आपल्या बंगल्यात किंवा मोठ्या फ्लॅटमध्ये एकटेच राहतात. घर आहे, पैसा आहे; पण एकाकीपणा खायला उठतो. कारण, आता मुले परदेशी गेली, परगावी गेली, त्यांची जबाबदारी नाही, त्यांना काही द्यावे लागत नाही; पण त्यांच्याशिवाय करमतही नाही. माणसाला माणसांशिवाय करमत नाही. आपली रक्ताच्या नात्याची माणसे सोबत असावीत असे वाटते. विशेषतः म्हातारपणी ही गरज अधिक असते. ती केवळ आर्थिक नसते. अनेकदा पैसा असूनही माणूस सोबत नसेल, तर हतबल आहे. किमान आजारी पडल्यावर, रुग्णालयात दाखल केल्यावर ऑपरेशनच्या वेळी फॉर्मवर सही करण्यासाठी तरी आपला माणूस सोबत हवा. मानवी नात्यांचा केवळ पैशांत विचार करणे चुकीचे आहे. विजयपत सिंघानिया यांच्या बाबतीत नक्की काय झाले, हे माहिती नाही. तथापि, त्यांच्याबद्दल बातम्यांमध्ये जे चित्र उभे राहिले, त्यावरून मतप्रदर्शन करणाऱ्यांनी व्यापक विचार करायला हवा. मानवी नात्यांत पैशांपेक्षा प्रेमच महत्त्वाचे ठरते. आपला सनातन समाज यावर उभा आहे. उगाच एखाद्या अपवादावरून मूळ विचारांबद्दल शंका निर्माण करू नये. विजयपत सिंघानिया विषय हा अपवादात्मक आहे, आपण अपवादला नियम मानून संपूर्ण आपली सनातनी संस्कृती नाकारायची का?

# महाराष्ट्रातील २५ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांची बदली; जाणून घ्या कोणाची कुठे झाली बदली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने एकाच वेळी २५ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करत प्रशासनात मोठा फेरबदल केला आहे. दोन दिवसांपूर्वीच १० अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर हा आणखी एक मोठा निर्णय मानला जात आहे. या बदल्यांमध्ये अनेक महत्त्वाच्या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नागपूर, सोलापूर यांसारख्या प्रमुख शहरांच्या प्रशासनात मोठे बदल करण्यात आले आहेत.

कोणाची कुठे बदली?

जी. श्रीकांत : छत्रपती संभाजीनगर महापालिका आयुक्त पदावरून नवी मुंबई येथे जल जीवन मिशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी

दिलीप स्वामी : छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी पदावरून अकोला येथे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक

वर्षा ठाकूर-घुगे : लातूर जिल्हाधिकारी पदावरून मुंबई येथे एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी

दीपक सिंगला : पीएमआरडीए, पुणे येथून नागपूर येथे मनरेगा आयुक्त

के. मंजुलक्ष्मी : कोल्हापूर महापालिका आयुक्त पदावरून पीएमआरडीए, पुणे येथे अतिरिक्त आयुक्त

डॉ. राजेंद्र भारूड : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई येथून कोल्हापूर महापालिका आयुक्त

डॉ. प्रवीणकुमार देवरे : पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्त पदावरून बुलढाणा जिल्हाधिकारी

डॉ. भरत बास्टेवाड : नागपूर मनरेगा आयुक्त पदावरून लातूर जिल्हाधिकारी

वर्षा लड्डा : पुणे येथून अमरावती महापालिका आयुक्त

अमोल येडगे : कोल्हापूर जिल्हाधिकारी पदावरून छत्रपती संभाजीनगर महापालिका आयुक्त

डॉ. विजय राठोड : एमआयडीसी, मुंबई येथून कोल्हापूर जिल्हाधिकारी

विनय गौडा जी.सी. : चंद्रपूर जिल्हाधिकारी पदावरून छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी

डॉ. किरण पाटील : बुलढाणा जिल्हाधिकारी पदावरून पुणे येथे पशुसंवर्धन आयुक्त

डॉ. मंगेश गोंदावले : एमआयडीसी, मुंबई येथून गोंदिया जिल्हाधिकारी

कुमार आशीर्वाद : सोलापूर जिल्हाधिकारी पदावरून नागपूर जिल्हाधिकारी

वसुमना पंत : नागपूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदावरून चंद्रपूर जिल्हाधिकारी

प्रजित नायर : गोंदिया जिल्हाधिकारी पदावरून पुणे महापालिकेत अतिरिक्त आयुक्त

अंकित : छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद सीईओ पदावरून नागपूर महापालिका अतिरिक्त आयुक्त

कार्तिकेयन एस. : कोल्हापूर जिल्हा परिषद सीईओ पदावरून सोलापूर जिल्हाधिकारी

संजीता महापात्रा : अमरावती जिल्हा परिषद सीईओ पदावरून सांगली-मिरज-कुपवाड महापालिका आयुक्त

मिन्नू पी. एम. : जालना जिल्हा परिषद सीईओ पदावरून छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद सीईओ

सत्यम गांधी : सांगली महापालिका आयुक्त पदावरून अमरावती जिल्हा परिषद सीईओ

जस्मिन : राजापूर (रत्नागिरी) सहाय्यक जिल्हाधिकारी पदावरून कोल्हापूर जिल्हा परिषद सीईओ

अंजली शर्मा : जालना महापालिका आयुक्त

कृष्णकांत कनवारिया : शहादा (नंदुरबार) सहाय्यक जिल्हाधिकारी पदावरून जालना जिल्हा परिषद सीईओ

एकूणच, राज्य सरकारने प्रशासन अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने हा मोठा फेरबदल केल्याचे मानले जात आहे. नवीन नियुक्त अधिकाऱ्यांसमोर स्थानिक पातळीवरील विविध प्रश्न सोडवण्याचे आव्हान असणार आहे.

## जमिनीच्या वादामुळं अभिनेत्री सोनाली बेंद्रे अडचणीत

पुणे : मावळ तालुक्यातील उकसान गावात जमिनीच्या वादावरून हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि तिचे पती गोल्डी बेहल अडचणीत सापडल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळं संपूर्ण मावळ परिसरात मोठी चर्चा रंगली असून, वडगाव मावळ येथील दिवाणी न्यायालयात याबाबत दावा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उकसान येथील सुमारे ३० गुंठे जमिनीवर स्थानिक शेतकरी चंद्रकांत शिंदे यांनी आपला वडिलोपार्जित कुळ हक्क असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ही जमीन १९५७ पूर्वीपासून त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यात आहे. मात्र, काही व्यक्तींनी कथितपणे खोट्या कागदपत्रांच्या आधारे हा हक्क डावलून संबंधित जमीन विक्री व्यवहार करण्यात आला. या व्यवहारात अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि त्यांचे पती गोल्डी बेहल यांचा समावेश असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादी शेतकरी चंद्रकांत शिंदे यांनी न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात नमूद केलं आहे की, संबंधित जमिनीवर बेकायदेशीरपणे बांधकाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच, त्यांच्या कुटुंबीयांना दमदाटी करून जागेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचाही, आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणी यापूर्वी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती. मात्र, हे प्रकरण दिवाणी स्वरूपाचे असल्यामुळं पोलिसांनी न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

## व्हीप निर्णयावरून भाजपला फायदा होऊ नये म्हणून मतदान टाळले : आंबादास दानवे

दैनिक आपला विदर्भ



**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिवसेना (ठाकरे गट) नेते आंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत विविध राजकीय मुद्द्यांवर भाष्य करताना व्हीपच्या निर्णयाचे समर्थन केले. भाजप आणि शिंदे गटाला अप्रत्यक्ष फायदा होत असल्याने मतदान न करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा निर्णय पक्षप्रमुखांच्या सल्ल्यानेच घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

कृष्णा डोणगावकर यांनी केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना दानवे म्हणाले की, कोणतीही गुप्त बैठक झालेली नाही. ''मी कर्जत येथे होतो आणि तेथे फक्त आमचेच सदस्य होते. एकनाथ शिंदे यांच्यासोबत कोणतीही बैठक झाली नाही,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले. दोन शिवसेना गट एकत्र येण्याबाबतही कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रताप जाधव यांच्या दिल्लीतील आमंत्रणावर बोलताना, ''दिल्लीमध्ये अशा जेवणावळी सामान्य असतात,'' असे सांगत त्यांनी त्याला विशेष महत्त्व नसल्याचे नमूद केले.

'लाडकी बहीण' योजनेवर टीका करताना दानवे म्हणाले की, ७१ लाख महिलांना अपात्र ठरवून सुमारे २१ हजार कोटी रुपयांचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकार महिलांची फसवणूक करत असल्याचा आरोप त्यांनी केला. नवनीत राणा यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी त्यावर भाष्य करण्यास नकार दिला. सुनेत्रा पवार यांच्या निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्राबाबतही तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय असल्याचे त्यांनी सांगितले.

खरात प्रकरणात केवळ एका व्यक्तीवर कारवाई न करता त्याला मदत करणाऱ्या राजकीय नेते आणि अधिकाऱ्यांचीही मार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी दानवे यांनी केली. तसेच अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मदत न मिळाल्याची टीकाही त्यांनी सरकारवर केली.

## महाराणी ताराराणीबाबत जैन मुनींच्या वक्तव्याला संभाजी ब्रिगेडचा आक्षेप

### केलेल्या विधानावर माफीची सतीश काळे यांची मागणी


दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** महाराणी ताराराणी जैन महाराणी होत्या असे जैन मुनी नयन पद्मसागर यांनी केलेल्या वक्तव्याला पिंपरी चिंचवड संभाजी ब्रिगेडने आक्षेप घेतला आहे. जैन मुनींचे हे वक्तव्य भावना दुखावणारे असून त्यामध्ये तत्काळ दुरुस्ती करून महाराष्ट्राची माफी मागावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांनी केली आहे.

काळे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे कि, जैन मुनी पद्मसागर यांनी नुकतेच एक विधान केले छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर औरंगजेबने अमानुष अत्याचार केल्यानंतर जैन महाराणी तारादेवींचा उदय झाला त्यांनी मुघल सत्तेला पराभूत केले असे विधान जैन मुनी पद्मसागर यांनी केले. या वक्तव्यावर संभाजी ब्रिगेडने आक्षेप घेतला. काळे म्हणाले की महाराणी ताराराणी या हंबीरराव मोहिते यांच्या कन्या आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा होत्या. त्यामुळे त्या कोणत्या कुळातील आहेत हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ताराराणी जैन असल्याबाबत इतिहासात अशा प्रकारचे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत. महाराणी ताराबाई या पराक्रमी योद्धा होत्या त्यांच्या कार्याबाबत चुकीची माहिती पसरवणे योग्य नाही. जैन धर्म हा सत्य, अहिंसा आणि शांततेचा संदेश देणारा धर्म आहे. त्यामुळे अशा प्रकारची विधाने करून समाजात गैरसमज पसरवू नयेत असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, संबंधित जैन मुनींचे वक्तव्य भावना दुखावणारे असल्याचा आरोप करत त्यांनी महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी अशी मागणीही संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे..

# मुस्लिम आरक्षणाचा कायदा होऊ न शकल्यानं तो अध्यादेश तांत्रिकदृष्ट्या रद्द, राज्य सरकारचं हायकोर्टात स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुस्लिम समाजाला देण्यात आलेलं आरक्षण रद्द करण्याचा राज्य सरकारचा निर्णय हा योग्यच होता. ठरलेल्या मुदतीत यासंदर्भात कायदाच तयार होऊ न शकल्यानं ते आरक्षण कायद्याच्या चौकटीत बसणारं नव्हतं. त्यामुळे तो अध्यादेश तांत्रिकदृष्ट्या रद्दबातलच झालेला होता. याबाबतची रितसर अधिसूचनाही जारी करण्यात आल्यानं यासंदर्भातील याचिकेला काहीही अर्थ नाही, अशी भूमिका गुरुवारी राज्य सरकारच्या वतीनं मुंबई उच्च न्यायालयात मांडण्यात आली.

याचिकाकर्त्यांचा दावा काय? – मुस्लिम आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात न्यायमूर्ती रियाझ छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी सुनावणी झाली. याचिकाकर्ते वकील एजाझ नक्वी यांनी यावेळी कोर्टाला सांगितलं की साल २०१४ मध्ये हायकोर्टानं याबाबत दिलेल्या निकालाला कुणाकडूनही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे हायकोर्टाच्या निर्देशांचं पालन करण्याऐवजी राज्य सरकारनं मनमानी पद्धतीनं हा निर्णय घेतलाय. त्यामुळे हा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आलीय. रातोरात राज्य सरकारनं शिक्षणात मुस्लिमांना दिलेलं ५ टक्के आरक्षण रद्द का केलं? असा सवाल याचिकेत उपस्थित करण्यात आलाय. या याचिकेवर उत्तर देण्याकरता राज्य सरकारनं दोन आठवड्यांचा अवधी गुरूवारी मागून घेतला, तो मान्य करत त्यावर त्यानंतर पुढील आठवड्याभरात याचिकाकर्त्यांना उत्तर देण्याचे निर्देश देत हायकोर्टानं यासंदर्भातील याचिकेवरील सुनावणी तहकूब केली.

राज्य सरकारचा निर्णय काय होता – राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागानं मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय काढून शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी तसेच निमसरकारी नोकऱ्यांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देणारा २३ डिसेंबर २०१४ रोजीच रद्द झालाय. मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेलाही या निर्णयामुळे ब्रेक लागणाराय. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर, आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवत राज्य सरकारनं मराठा आणि मुस्लीम आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला होता. ज्यात सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर केलं गेलं होतं. यामुळे राज्यातील एकूण आरक्षण हे ७३ टक्के झालं होतं. राज्याचे तत्कालीन अल्पसंख्याक कल्याण मंत्री नसीम खान यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी ५ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव कोणत्याही चर्चेशिवाय एकमतानं मंजूर करण्यात आला होता. पुढे हायकोर्टानं सरकारी नोकरीत मुस्लीम समाजाला आरक्षण अमान्य करत शिक्षणातील आरक्षणाला हिरवा कंदील दाखवला होता. मात्र साल २०१४ मध्ये सत्तेत आलेल्या भाजप सरकारनं शिक्षणातील आरक्षणाची अंमलबजावणी कधी केली नाही. त्यामुळे ९ जुलै २०१४ रोजीचा अध्यादेशाचं डिसेंबर २०१४ पर्यंत कायद्यात रूपांतरच न झाल्यानं हा अध्यादेश रद्द झाला होता.

जो कायदा कधी लागूच नव्हता तो रद्द कसा झाला? – अबू आझमी या निर्णयाबाबत समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं होतं की, भाजप सरकार मुस्लिमांच्या विरोधात काम करतंय. कायदा रद्द केला असं सरकार म्हणत असलं तरी हा कायदा कधी बनवलाच गेला नव्हता, मुल्सीम समाजाची आजवर केवळ दिशाभूल केली गेल्याचं अबू आझमी यांनी स्पष्ट केलं होतं. तर महायुती सरकारनं मुस्लीम समाजाचे आरक्षण रद्द करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत चुकीचा आणि अल्पसंख्याक समाजावर अन्याय करणाराय. हे आरक्षण रद्द करून भाजप सरकारनं अल्पसंख्याक समाजाला विकासाच्या प्रवाहात येण्यापासून रोखण्याचं पाप केलंय. भाजप सरकार मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समाजाच्या विरोधात काम करतंय, अशी टीका काँग्रेस नेते आणि माजी मंत्री नसीम खान यांनी केली होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

### तलवार बाबा प्रकरण तापले; अनिसचे आरोप फेटाळले, एक लाख तलवारी वाटपाचा दावा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील बडूर परिसरात 'तलवार बाबा' प्रकरणाने सध्या खळबळ उडवली असून, या प्रकरणात नवीन वाद निर्माण झाला आहे. अनिस (अंधश्रद्धा निर्मूलन समिती) कडून करण्यात आलेले आरोप ज्ञानेश्वर करडे उर्फ 'तलवार बाबा' यांनी फेटाळून लावले आहेत. तलवार बाबा रविवारी दरबार भरवत असून, हातात तलवार घेऊन दैवी शक्ती असल्याचा दावा करत भाविकांवर विविध धार्मिक विधी करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यानुसार बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तलवार बाबा आणि त्यांच्या दोन साथीदारांविरुद्ध कारवाई केली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, सर्व आरोप फेटाळून लावत तलवार बाबा यांनी आपण कोणतीही चुकीची कृती केली नसल्याचा दावा केला आहे. समाजमाध्यमांवर 'तलवार बाबा' म्हणून ओळख निर्माण झाल्याचे सांगत, एक लाख महिलांना तलवारी वाटण्याचा संकल्प केल्याचे त्यांनी जाहीर केले. तसेच, आपण एम.ए.डी. फार्मसीपर्यंत शिक्षण घेतले असून पूर्वजांपासून चालत आलेल्या श्रद्धेमुळे या मार्गावर आलो असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या संपूर्ण प्रकरणामुळे परिसरात चर्चांना उधाण आले असून, नागरिकांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. पोलिस प्रशासन या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

### पुण्यातील सुप्रसिद्ध उद्योगपती ओमप्रकाश रांका यांचे निधन

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील सुप्रसिद्ध उद्योगपती, रांका ज्वेलर्सचे संचालक आणि दानशूर व्यक्तीमत्व ओमप्रकाश नगराज रांका (वय ७१) यांचे गुरुवारी संध्याकाळी (२ एप्रिल) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (३ एप्रिल) सकाळी ११ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. ओमप्रकाश रांका यांचे पार्थिव शुक्रवारी सकाळी मुकुंदनगर येथील निवासस्थानावरुन निघेल.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे बुधवारी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्तात मुलगा वास्तुपाल आणि दोन मुली, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध सराफ व्यावसायिक फतेचंद रांका यांचे ते कनिष्ठ बंधू होत.

पुण्यातील सुप्रसिद्ध सराफी पेढी रांका ज्वेलर्सचा विस्तार करण्यात ओमप्रकाश यांचा सिंहाचा वाटा होता. शालेय शिक्षण संपवून त्यांनी लगेचच रविवार पेठ येथील रांका ज्वेलर्सच्या पेढीमध्ये काम करायला सुरुवात केली होती. व्यवसायासोबतच दानशूर व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा लौकिक होता. पुणे आणि बाहेरील अनेक धार्मिक, सामाजिक संस्थांशी ते जोडलेले होते. जीतो पुणे चॅप्टरचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी चांगली कामगिरी केली होती.

# क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबिरातून घडतील उत्कृष्ट खेळाडू-कारागृह अधीक्षक मेघा बाहेकर

## बुलढाणा जिल्हा क्रीडा संकुलात उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** उन्हाळी सुटीचा सदुपयोग करून मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने आयोजित ग्रीष्मकालीन क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबिर हे भविष्यातील उत्कृष्ट खेळाडू घडवण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरेल, असा विश्वास जिल्हा कारागृह अधीक्षक मेघा बाहेकर यांनी व्यक्त केला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे), जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित या शिबिराचा उद्घाटन सोहळा जिल्हा क्रीडा संकुल, जाभरून रोड येथे उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा स्काऊट अँड गाईड अधिकारी कविता पवार आणि सुनील जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मेघा बाहेकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिबिरार्थींना खेळाचे महत्त्व पटवून दिले व व्यक्तिमत्व विकासावर भर दिला. कविता पवार यांनी शिबिराच्या माध्यमातून मुलांमध्ये खेळाची गोडी निर्माण करणे हा मुख्य उद्देश असून, विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शिबिराचे स्वरूप आणि उपक्रम जिल्हा क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या रूपरेषेबद्दल माहिती दिली. या शिबिरात केवळ मैदानी खेळच नव्हे, तर मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.यामध्ये ॲथलेटिक्स, हॅण्डबॉल, फुटबॉल, खो-खो, कबड्डी, जिम्नॅस्टिक्स आणि स्पोर्ट्स नर्सरी, तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला, वादविवाद, सामान्य ज्ञान, सुंदर हस्ताक्षर, नृत्य स्पर्धा आणि ॲरोबिक्स, लाठीकाठी, प्राणायाम, दंतचिकित्सा आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंचे विशेष मार्गदर्शन दिले जाणार आहे.

हे शिबिर दोन सत्रांत चालणार असून सकाळी ६.१५ ते ८.१५ आणि सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत प्रशिक्षण दिले जाईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जीवन मोहोड यांनी, तर आभार प्रदर्शन उज्वला लांडगे यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## सिल्लोड तालुक्यात वीजेचा कहर; दोन बैलांचा मृत्यू, शेतकरी संकटात

**वादळी पावसात विजेचा प्रहार; दीड ते दोन लाखांचे नुकसान, मदतीची मागणी**

दैनिक आपला विदर्भ

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील वडाळीपन्हाळेश्वर शिवारात वादळी पावसासह कडाडणाऱ्या विजेमुळे मोठी दुर्घटना घडली. या घटनेत दोन बैलांचा जागीच मृत्यू झाल्याने शेतकरी कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे.

वडाळी येथील शेतकरी नामदेव भागाजी जाधव व त्यांचा मुलगा कैलास जाधव हे गट क्रमांक २८ मधील शेतात काम करत असताना दुपारी अचानक वारा सुटून वातावरणात बदल झाला. ढगांचा गडगडाट सुरू असतानाच अचानक वीज कोसळली. शेतात वेळूच्या आळ्याजवळ बांधलेल्या दोन्ही बैलांचा तडफडून मृत्यू झाला. या विजेच्या प्रहारामुळे आळ्यालाही आग लागल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे तलाठी प्रतिभा इंगळे, विष्णू गवळी तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एस. एस. चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. गावकऱ्यांनी जाधव कुटुंबाला धीर देत मदतीचा हात पुढे केला.



दरम्यान, अल्पभूधारक असलेल्या या शेतकऱ्याचे अंदाजे दीड ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाले असून प्रशासनाकडून तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे.

## वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस व गारपिटीने शेतीचे मोठे नुकसान; सोलर प्लेट्सही तुटल्या

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महार चिकना :** लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळांतर्गत महार चिकना तसेच परिसरातील गावांमध्ये दिनांक १ एप्रिल रोजी सायंकाळी सात ते साडेसात वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या अवकाळी पावसामुळे गहू व कांदा पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेषतः बियाच्या कांद्याची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. सोयाबीन व कापसाच्या वाढत्या उत्पादन खर्चामुळे अनेक शेतकरी रब्बी हंगामात कांद्याची लागवड करतात, मात्र अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे त्यांच्या हातचे पीक गेले आहे. तसेच जोरदार वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सोलर प्लेट्सचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महार चिकना शिवारातील आसराबाई प्रल्हाद सोनुने यांच्या शेतातील विहिरीवरील सोलर प्लेट्सना गारपिटीमुळे तडे गेले असून त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी हवालदिल झाले असून, प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.






## शब्दकोडे क्र. 98

आडवे शब्द

१. शाब्दिक हजामत ५. बोकड ७. वर्षा ऋतू १०. व्यवस्थित ११. खंदक १२. कल्याणकारी सल्ला १३. तालासुराचे एकत्र येणे १४. राघूची जोडीदार १५. समोरासमोरची चकमक १६. खानेसुमारी १८. कापड कापण्याचे साधन १९. जमीन, पृथ्वी २०. लोकनाट्यातील कलाकार २३. विशेष २५. खर्चाच्या विरुद्ध २७. बोबडी वळणे २९. न आवडणाऱ्या व्यक्तीतील चांगले गुणही वाईट भासतात (ला.) ३३. पृथ्वी ३५. शरीर ३६. मराठी भाषते या दोन अक्षरांपासून सुरू होणारा एकही शब्द नाही ३८. कालावधी ३९. नादी लागणे ४१. उद्याच्या नंतरचा दिवस ४३. मृत्यू नसलेला ४५. क्रिकेटमधील धाव ४६. शेवटचे दोन पांडव ४९. पुष्परस ५०. जनन ५१. ढीग ५३. पावाबरोबरचा खाद्यपदार्थ ५४. माराची उमटलेली खूण ५५. जयपराजय ५७. रात्री चमचमणारा कीटक ५८. सणांचा मराठी महिना ५९. केस कापणे ६१. सीतेचा एक पुत्र ६५. घाबरणे ६७. मोठी टोपली ६९. शर्करा ७१. बांबू ७३. हार, सर ७४. राष्ट्रगीताची सुरूवात ७६. ठाणवाई ७८. बाळाचा पाण्याचा शब्द ७९. रसाळ, तजेलदार ८२. एकरूप, रममाण ८३. कामदेव ८४. कसोटी

उभे शब्द

१. श्रीमंत, धनवान २. नारळाचे झाड ३. मांडणी ४. पोटाचा असल्यास चिंतेचे कारण! ५. पुष्कळ ६. सततचे नामस्मरण ७. बंधन ८. माल ९. सामन्यातील पराक्रमी खेळाडू १२. बर्फ १३. आंदोत्सवाचा दिवस १४. दोस्ती १६. अटीची भाषा १७. अदृश्य १८. कूर्म २१. आत्या २२. गाणे २३. भोजनालय २४. आघाडी, एकजूट २५. वतनदार २६. कच्चे मडके? २८. वाढलेला व्याप, अस्ताव्यस्त सामान ३०. नगाऱ्याचा आवाज ३१. चैतन्य, प्रोत्साहन ३२. थंड झाल्यावर पदार्थाचे आकसणे, आकुंचन पावणे ३४. नवरामुलगा ३७. लहान चणीचा ४०. सिंह ४१. दुर्दशा ४२. खास कोकणी द्विदल धान्य ४३. खालचा ओठ ४४. चित्रपट ४७. आरास ४८. सुबक अक्षर ४९. थोर, मोठा ५२. प्रश्न ५६. प्राण ६०. मवाळ धोरण ६२. वागणूक ६३. चप्पल ६४. दरी ६६. वेदनेची तिडीक ६८. श्रीरामाचे स्तोत्र कवच ७०. दर्यावर्दी ७१. शिखराचे टोक ७२. वाळवी ७४. अलीकडेच सुनामीच्या तडाख्यात सापडलेला देश ७५. धमनी ७७. चामखीळ ७८. पाय ८०. जाड दोर ८१. सरोवर, तडाग



### शब्दकोडे क्र. 97 चे उत्तर

आडवे उत्तर

१.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

उभे उत्तर

१.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ

# पत्रकार परिषद संपताच रौंदळे पोलिसांच्या ताब्यात; डोणगाव प्रकरणाला नवे वळण

## ठाणेदारांच्या निलंबनाची मागणी कायम; चौकशीसाठी महिन्याची मुदत, आंदोलनाचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव पोलीस ठाण्याच्या कारभारावर गंभीर आरोप करत धनंजय माधवराव रौंदळे यांनी ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या निलंबनाची मागणी केली असतानाच, आज घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. रौंदळे यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथील मंत्रालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला असून, यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री,



पोलिस महासंचालक, जिल्हाधिकारी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे. तक्रारीनुसार, डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा क्रमांक १३५/२०२५ मध्ये कोणतीही सखोल चौकशी न करता त्यांना व त्यांच्या भावाला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले. ११ जून २०२५ रोजी आंध्रूड येथे घडलेल्या वादप्रसंगी ते घटनास्थळी उपस्थित नसतानाही त्यांना मुख्य आरोपी करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, घटनेच्या वेळी ते डोणगाव येथे होते, तर त्यांचे भाऊ वाशिम जिल्ह्यातील रिसोड येथे होते. यासंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज व इतर पुरावे सादर करण्यासाठी त्यांनी वारंवार प्रयत्न केले, मात्र पोलिसांनी अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याचा आरोप आहे. ईमेल व टपालाद्वारे पाठपुरावा करूनही कोणतीही दखल घेतली गेली नाही, असेही त्यांनी नमूद केले. पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप करत रौंदळे यांनी सात दिवसांत न्याय न मिळाल्यास मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

### चौकशीसाठी महिन्याची मुदत

या प्रकरणासंदर्भात डोणगाव येथे एका हॉटेलमध्ये पत्रकार परिषद पार पडली. परिषदेनंतर पोलिसांनी रौंदळे यांना ताब्यात घेऊन त्यांचा लेखी जबाब नोंदवला. दरम्यान, संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी एक महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला असून या कालावधीत सखोल तपास केला जाणार आहे. या मुदतीत कारवाई न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आल्याची माहिती.धनंजय माधवराव रौंदळे यांनी आपला विदर्भ ला दिली आहे

# मेहकर वकील संघाचा ‘ईद मिलन’ सोहळा; सलोखा आणि एकतेचा सुंदर संदेश







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर वकील संघ आणि मुस्लिम वकील बांधवांच्या संयुक्त विद्यमाने १ एप्रिल २०२६ रोजी वकील संघाच्या सभागृहात ‘ईद मिलन’ कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून सामाजिक एकता आणि वकीलांमधील आपुलकीचे वातावरण अधोरेखित झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जे. जी. निकस होते. प्रमुख पाहुणे म्हणून अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश सागर मुंगीलवार, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) श्रीमती गायगोले तसेच दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती पाटील व श्रीमती कांबळे उपस्थित होते. वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अनिल अडेलकर यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.

यावेळी वक्त्यांनी न्यायालय हे केवळ वाद निवारणाचे केंद्र नसून एक कुटुंब असल्याचे सांगत, अशा कार्यक्रमांमुळे परस्पर स्नेह वृद्धिंगत होतो, असे मत व्यक्त केले. ‘‘सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्यासाठी असे उपक्रम आवश्यक आहेत,’’ असे मत ॲड. अडेलकर यांनी मांडले.

मुस्लिम वकील बांधवांनी कार्यक्रमाचे नियोजन करून उपस्थितांचे स्वागत केले. शिरखुर्मा व फराळाचे वाटप करण्यात आले. वकील, न्यायालयीन कर्मचारी व पक्षकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. दिलशाद कुरेशी, ॲड. रमिज खान, ॲड. सय्यद मोईन, ॲड. जमील कुरेशी, ॲड. शोएब खान आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक ॲड. रमिज खान यांनी तर सूत्रसंचालन ॲड. संजय नवघरे यांनी केले.

आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश सागर मुंगीलवार यांनी ‘‘एकमेकांच्या श्रद्धांचा सन्मान करणे हेच सुसंस्कृत समाजाचे लक्षण आहे,’’ असे सांगत आयोजकांचे कौतुक केले.

# आपचा मोठा निर्णय! खासदार राघव चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवलं

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

आम आदमी पार्टीमध्ये (आप) संघटनात्मक बदल होताना दिसून येत आहे. अशातच पक्षानं राज्यसभेतील आपल्या नेतृत्व रचनेत मोठा बदल करत, प्रभावी आणि लोकप्रिय खासदार राघव चड्ढा यांना उपनेतेपदावरून हटवलं आहे. त्यामुळं राघव चड्ढा यांना त्यांच्याच पक्षानं मोठा धक्का दिला आहे.

राघव चड्ढा यांच्या जागी लुधियानाचे खासदार आणि लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे संस्थापक अशोक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, पक्षानं सचिवालयाला पाठवलेल्या पत्रात स्पष्ट करण्यात आलं आहे की, यापुढं अशोक मित्तल राज्यसभेत पक्षाचे उपनेते म्हणून जबाबदारी पार पाडतील.

उपनेतेपदावरून हटवल्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चा : राघव चड्ढा यांना त्यांच्या पदावरून हटवल्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे. राघव चड्ढा हे आतापर्यंत संसदेत विविध मुद्दे आक्रमकपणे मांडत होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून राघव चड्ढा यांच्या पक्षातील सक्रियतेवर आणि भूमिकेवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याचबरोबर, यापूर्वी पक्षाच्या स्टार प्रचारकांच्या यादीतून राघव चड्ढा यांचं नाव वगळण्यात आलं होतं, ज्यामुळं बरीच चर्चा झाली होती. दरम्यान, आता त्यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवण्यामागील कारण पक्षानं अद्याप स्पष्ट केलं नाही. मात्र, पक्षाच्या धोरणांचे पालन न करणे, हे या निर्णयामागील कारण असण्याची शक्यता आहे.

राघव चड्ढा हे केजरीवालांच्या विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक : एकेकाळी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सर्वात विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या राघव चड्ढा यांना अचानक राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवल्यामुळं अनेक तर्कवितर्कांना वाव मिळत आहे. राघव चड्ढा दिल्ली आणि पंजाबच्या राजकारणात अत्यंत सक्रिय राहिले आहेत, परंतु गेल्या काही महिन्यांपासून त्यांचं मौन आणि पक्षाच्या प्रमुख कार्यक्रमांमधील त्यांची अनुपस्थिती. हे त्यांच्या आणि पक्ष नेतृत्वामध्ये काहीतरी बिनसले असल्याचे संकेत देत आहे.

## शिवसेना अन् राष्ट्रवादीचे २५ ते ३0 आमदार भाजपामध्ये होणार विलीन: राऊतांच्या दाव्याने खळबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा स्वतंत्र पक्ष आहे त्या पक्षाविषयी दुसऱ्या पक्षातील लोकांनी बोलणं अयोग्य आहे. मात्र एक गोष्ट मी खात्रीनं सांगतो की, एकनाथ शिंदे यांचे आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे २५ - ३० आमदार हे भाजपामध्ये विलीन होतील, असा दावा संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केला.



यावेळी शिवसेना पक्षाच्या सुननावणीवर बोलताना संजय राऊत म्हणाले की, ''काल पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टाने सुनावणी २३ तारखेला पुढे ढकलली आहे. घटनात्मक पेच असलेली सुनावणी पुढे ढकलले जात आहे. यामुळे भविष्यात न्यायालयावर विश्वास कोण ठेवणार?''

उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेवर जावे : दुसरीकडे शरद पवार यांच्या विषयी बोलताना संजय राऊत म्हणाले की, ''शरद पवार यांची प्रकृती बरी नव्हती. यासाठी त्यांची भेट घ्यायला मी गेलो असता, त्यांनी महाराष्ट्र दौरा आखला असल्याचं सांगितलं. लवकरच शरद पवार हे संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. याचबरोबर विधान परिषदेवर उद्धव ठाकरे यांनी जावं. ती निवडणूक बिनविरोध व्हावी ही आमची इच्छा आहे. मात्र याविषयी शरद पवार यांच्यासोबत मी काहीही बोललेलो नाही. स्वत: उद्धव ठाकरे याविषयी शरद पवार यांच्याशी बोलतील.''

देवेंद्र फडणवीस यांनी महाराणी ताराराणी यांच्याबाबत भूमिका घेतली नाही : ''काल पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टानं सुनावणी २३ तारखेपर्यंत पुढं ढकलली आहे. घटनात्मक पेच असलेली सुनावणी पुढं ढकलली जात आहे. यामुळे भविष्यात न्यायालयावर विश्वास कोण ठेवणार? असा प्रश्न यावेळी संजय राऊत यांनी विचारला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजूनही महाराणी ताराराणी यांच्या संदर्भात झालेल्या विधानावर कोणतीही भूमिका घेतलेली नाही. कोणतेही वक्तव्य केले नाही. ताराराणी यांचा धर्म बदलण्याचे काम एका मुनीने केले आहे. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी बोलले पाहिजे, असे यावेळी संजय राऊत म्हणाले.

# हनुमान जयंतीनिमित्त नगराध्यक्ष गारोळे यांचे दर्शन; सामाजिक ऐक्याचा संदेश







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** हनुमान जन्मोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी बालाजी नगर येथील नरहरी मंदिरात जाऊन श्री हनुमानाचे भक्तिभावाने दर्शन घेतले.

यावेळी त्यांनी केवळ धार्मिक विधी न करता, शहरातील नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी, आरोग्यासाठी आणि संकटांवर मात करण्याच्या शक्तीसाठी प्रार्थना केली. यावेळी बोलताना गारोळे यांनी सांगितले की, हनुमान जयंती हा केवळ धार्मिक सण नसून समाजात एकोपा, बंधुभाव आणि सेवाभाव जागृत करणारा दिवस आहे. आजच्या काळात समाजाने एकत्र येत सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे गरजेचे आहे.

मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विविध घटकांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकात्मतेचा संदेश देत होते. या निमित्ताने सामाजिक सलोखा आणि एकजूट अधोरेखित झाली.

या प्रसंगी नगरसेवक महेश रिंढे, उमेश शिलवंत, गजानन रिंढे, संतोष शिलवन, संदीप भांगे, जुमले सर, गवई सर, रमेश आव्हाळे, शाम ठाकरे, बंडू खबाले यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते...

## वृत्तविशेष...

### जिल्हा रुग्णालयातील शुक्रवारचे (दि.३) दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रुग्णालय, बुलडाणा येथे दर शुक्रवारी नियमितपणे नेत्र, मतिमंद/मनोरुग तसेच कान-नाक-घसा संबंधित दिव्यांग तपासणीसाठी विशेष बोर्ड आयोजित केला जातो. मात्र येत्या ३ एप्रिल २०२६ रोजी ‘गुड फ्रायडे’ निमित्त शासकीय सुट्टी असल्याने या दिवशी होणारे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे.

सदर दिवशी (पहिला शुक्रवार) नेत्र, मतिमंद/मनोरुग व कान-नाक-घसा संबंधित दिव्यांग तपासणी होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी ३ एप्रिल रोजी जिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तरीही कोणी नागरिक तपासणीसाठी आले, तर होणाऱ्या गैरसोयीस प्रशासन जबाबदार राहणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचा जिल्हा दौरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर हे मंगळवार व बुधवार दि. ७ व ८ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आहे. दौऱ्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी संदर्भात विविध विभागाचा आढावा घेणार आहे.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजता शेगाव सर्कीट हाऊस येथे आगमन व राखीव.

बुधवार दि. ८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शेगाव येथून बुलढाणाकडे प्रयाण, दुपारी १२ वाजता सफाई कर्मचारी संघटना सोबत बैठक व चर्चा. दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत भोजन व राखीव. दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगांराच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे बाबतच्या अधिनियम २०१३ ची अंमलबजावणी बाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारणाकरीता केलेल्या उपाययोजना संदर्भात आढावा बैठक. बैठकीनंतर पत्रकार परिषद होईल. सायंकाळी ५ वाजता सफाई कर्मच्याऱ्यांच्या वस्त्यांना भेट व चर्चा. त्यानंतर रात्री ७ वाजता बुलढाणा सर्कीट हाऊस येथे मुक्काम.

### बुलढाण्यात हनुमान जन्मोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा, भाविकांची मोठी गर्दी



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** येथील स्वंयभू मारोती संस्थानात हनुमान जयंती उत्सव विविध कार्यकांनी साजरा करण्यात आला. या उत्सवाची महाप्रसादाने सांगता करण्यात आली. बुलढाणा येथील स्वंयभू मारोती संस्थान येथे हनुमान जयंती निमित्त हनुमान जन्मोउत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील पत्रकार भवन परिसरातील स्वंयभू मारोती संस्थानात ४१ वर्षा पासून हा उत्सव साजरा करण्यात येतो. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हनुमान जयंती निमित्त हनुमान जन्मोउत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.. या निमीत्त १ एप्रिल रोजी सुनिल जोशी यांचे शारदा भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.. तर आज २ एप्रिल रोजी गुरुवारी सकाळी ६ वाजता हनुमंतरायाचा जन्मोतउत्सव पार पडला.. सकाळी १० ते १२ लोकजागरण मंचचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.. यानंतर दुपारी १२ ते ४ वरण, भात, पोळी, वांग्याची भाजी, बुंदी असा महाप्रसादाचे वाटप करण्यात येवून जन्मोउत्सवाची सांगता करण्यात आली.. यावेळी स्वंयभू मारोती संस्थान मित्रमंडळ, बुलढाणा यांनी परिश्रम घेतले.

### भोंदूबाबा खरातला भर चौकात फाशी द्या, नवनीत राणा आक्रमक

**अमरावती:** अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाची राज्यात मोठी चर्चा सुरू आहे. अशोक खरातला पोलिसांनी अटक केली आहे. त्याची एसआयटीमार्फत चौकशी सुरू असून दररोज धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. या प्रकरणात विविध स्तरातून प्रतिक्रिया उमटत आहेत. सम ाज माध्यमांवर अनेक व्हिडिओ प्रसारीत होत आहेत. त्यामुळे वेगळाच प्रश्न निर्माण झाला आहे. भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी प्रथमच या प्रकरणी भाष्य करताना भोंदूबाबा अशोक खरात याला भर चौकात फाशी दिली पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.